महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

==========================================================================

जावक क्रमांक – ४१ दिनांक :- ३ एप्रिल, २०२५

प्रसिद्धिपत्रक

# म्हाडा उपाध्यक्षांचा चालता-फिरता जनता दरबार

म्हाडामध्ये जनता दरबारचे आयोजन ५ अर्जदारांच्या समस्यांचे तात्काळ निवारण

मुंबई, दि. ३ एप्रिल, २०२५ : नागरिक आणि म्हाडा प्रशासन यांच्यात सुसंवाद प्रस्थापित करून नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने म्हाडा उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी आज ५ अर्जदारांच्या तक्रारींवर सुनावणी दिली तसेच त्यांनी म्हाडा गृहनिर्माण भवनातील विविध कार्यालयांना भेट देऊन नागरिकांशी चर्चा करून त्यांचे प्रश्न जाणून घेतले.

वांद्रे येथील म्हाडा मुख्यालयात आयोजित जनता दरबार आज वेगळ्या पद्धतीने घेण्यात आला. जनता दरबार अंतर्गत प्राप्त ५ अर्जदारांच्या तक्रारींवर श्री जयस्वाल यांनी सुनावणी दिली व त्यांच्या तक्रारींचे तात्काळ निराकरण करत संबंधित अधिकार्यांलना सदर बाबत निर्देशही दिले. सभागृह आणि सुनावणी असे नेहमीचे चित्र मोडीत काढत श्री जयस्वाल यांनी म्हाडा गृहनिर्माण भवनातील विविध कार्यालयांना भेट दिली. ज्या कार्यालयांमध्ये अधिकाधिक नागरिक उपस्थित होते त्या कार्यालयाला भेट देऊन त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. तसेच त्यांना म्हाडा अधिकार्यां कडून सहकार्य मिळत असल्याबाबत चौकशी देखील केली. अशाप्रकारे १२ प्रकरणांमध्ये त्यांनी नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या समस्यांचे निवारण केले. अनेक प्रसंगी अधिकार्यांरच्या नागरिकांशी सौहार्दपूर्ण व्यवहारचे कौतुक देखील केले.

नागरिकांचे दैनंदिन जीवन सुखकर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या प्रशासनिक विभागांकरिता मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशानुसार व राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी केलेल्या सूचनेनुसार १०० दिवसांचा कृती आराखडा निश्चित करण्यात आला आहे. म्हाडाच्या सर्व विभागीय मंडळांनी १०० दिवसांच्या सात कलमी कृती आराखड्यातील "नागरिकांच्या तक्रारींचे निवारण" या महत्त्वपूर्ण घटकाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी म्हाडामध्ये जनता दिन आयोजित करण्यात येत आहे. तसेच श्री. जयस्वाल यांनी म्हाडाच्या विभागीय मंडळांतर्फे देखील नियमितपणे जनता दरबारचे आयोजन करण्याचे नुकतेच निर्देश दिले आहेत, त्यानुसार छत्रपती संभाजी नगर आणि नाशिक येथील गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळांमध्ये जनता दरबार आयोजित करण्यात आला व त्यास नागरिकांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद लाभला.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial